# इतिहास विभाग

# अहवाल-२०१८-१९





रामकृष्ण परमहंस महाविद्यालयातील इतिहास विषयाचे प्रा.डॉ.सरनाईक विकास यांचे ‘इतिहासलेखनशास्त्र’विषयावर व्याख्यान - दि. ०६.०८.२०१८.







कार्यक्रमास उपस्थित विद्यार्थी, प्राध्यापक - कर्मचारी



# अतिथी व्याख्यान

## दि. ०६.०८.२०१८

आज दि. ०६.०८.२०१८ रोजी सकाळी ११.३० ते १२.३० यावेळेत महाविद्यालयाच्या इतिहास विभागाच्या वतीने बी ए प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या इतिहासाच्या विद्यार्थ्यांसाठी कक्ष क्र. १८ (Smart Room) मध्ये अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

सोमवार दि. ०६.०८.२०१८ रोजी सकाळी ११.३० ते १२.३० यावेळेत मा. प्राचार्यांच्या पूर्वसंमतीने आयोजित ***'इतिहासलेखनशास्त्र'*** या विषयावरील अतिथी व्याख्यानामध्ये उस्मानाबाद शहरातील रामकृष्ण परमहंस महाविद्यालयातील इतिहास विभागातील ***प्रो.डॉ. सरनाईक विकास मोहन*** यांनी विद्यार्थ्यांना उद्बोधित केले.यावेळी त्यांनी  इतिहासलेखनाचे टप्पे, पद्धती, अडचणी याबरोबरच कालानुसार इतिहासलेखनातील बदल, समाजोपयोगी इतिहास संशोधन आणि इतिहासाचे उपयोग इत्यादी बाबत सखोल मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाच्या प्रारंभी इतिहास विभागप्रमुख प्रा.डॉ कुलकर्णी जे.आर. यांनी व्याख्यात्यांचा परिचय करून दिला. त्यानंतर राज्यशास्त्र विभागातील प्रा. श्री. हारगे यांच्या हस्ते व्याख्यात्यांचे स्वागत करण्यात आले. प्रा. श्री. हारगे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. तर  इतिहास विभागप्रमुख प्रा.डॉ कुलकर्णी जे.आर. यांनी आभारप्रदर्शन केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्रा. श्री. काशीद, प्रा. श्री.माळी प्रा.श्री. रसाळ यांनी उपस्थिती दर्शविली.

या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी इतिहास विभागातील प्रा.श्री. रवींद्र कुलकर्णी, तृतीय वर्षाचे विद्यार्थी, तसेच सेवक वर्गाचे सहकार्य लाभले.




ब्राह्मी व मोडी लिपी वर्ग उद्घाटन:उद्घाटक व मार्गदर्शक सई जयंत देशमुख

स्वागत करताना समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा.अशोक गोरे  दि.०१.०८.२०१८








ब्राह्मी व मोडी लिपी वर्ग उद्घाटन प्रसंगी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्रा. अशोक गोरे, आभारप्रदर्शन करताना राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. दिनकर रासवे आणि कार्यक्रमास उपस्थित विद्यार्थी.



# ब्राह्मी, मोडी लिपी वर्ग उद्घाटन

## दि. ०१.०८.२०१८

आज दि. ०१.०८.२०१८,बुधवार रोजी सकाळी ९.४० ते १०.३० यावेळेत महाविद्यालयाच्या इतिहास विभागाच्या वतीने बी ए द्वितीय व तृतीय वर्षाच्या इतिहास विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी कक्ष क्र. १६ मध्ये ***ब्राह्मी, मोडी लिपी वर्गाचा उद्घाटन*** कार्यक्रम आयोजित करण्यात आला. सहा महिन्याचा, महाविद्यालय पातळीवर राबविला जाणारा हा अभ्यासक्रम इतिहास विभाग प्रमुख प्रा.डॉ.कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली चालणार आहे.

या वर्गाच्या उद्घाटनासाठी रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, उस्मानाबाद येथे बी एस्सी करत असलेल्या व ब्राह्मी लिपीचा ONLINE अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या ***कु. सई जयंत देशमुख*** हिची प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थिती लाभली. तिने ब्राह्मी लिपीचा इतिहास, तिचा वर्तमान काळातील उपयोग,भारतातील विविध लिपी व त्यांच्या अभ्यासक्रमांची आणि त्यातील करिअर संधींची सखोल माहिती विद्यार्थ्यांना दिली. भाषांतर आणि लिप्यंतर यातील फरक, विविध लिपींचा तुलनात्मक अभ्यास करण्याची पद्धती इत्यादी कौशल्ये सोप्या पद्धतीने सांगितली.त्यानंतर अध्यक्षीय समारोपामध्ये समाजशास्त्र विभाग प्रमुख **प्रा.श्री. अशोक गोरे** यांनी या उपक्रमाचे कौतुक केले व विद्यार्थ्यांना त्याचा पुरेपूर लाभ घेण्याचे आव्हान केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इतिहास विभाग प्रमुख **प्रा.डॉ.कुलकर्णी जे.आर.यांनी** केले. तर आभारप्रदर्शन राज्यशास्त्र विभाग प्रमुख **प्रा. श्री. दिनकर रासवे** यांनी केले. कार्यक्रमाचे संयोजन व यशस्वीतेसाठी इतिहास विभागातील **प्रा. श्री. रवींद्र कुलकर्णी** यांनी मोलाचे सहकार्य केले.



## वर्गातील नियमित ब्राह्मी-मोडी अध्यापन



# ब्राह्मी, मोडी लिपी वर्ग-अहवाल

इतिहास विभागाच्या वतीने पूर्व नियोजनानुसार दिनांक ०१ ऑगस्ट २०१८ ते १५ ऑक्टोबर २०१८ या कालावधीत बी ए तृतीय वर्षाच्या इतिहास विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी मोडी व ब्राह्मी लिपी अध्यापन वर्गाचे आयोजन करण्यात आले. या वर्गाच्या उद्घाटना करिता बहिस्थ विषय तज्ञ म्हणून कु सी जयंत देशमुख यांना आमंत्रित करून या वर्गाचे उद्घाटन केले गेले. नियमित तासिकांमध्ये तृतीय वर्ष इतिहासाच्या विद्यार्थ्यांना १०.१० ते ११.०० ही तासिकेमध्ये मोडी व ब्राह्मी लिपीचे अध्यापन करण्यात आले. यावेळेत मोडी व ब्राह्मी लिपीचे धडे मुलांना देऊन महाविद्यालयीन वेळेच्या व्यतिरिक्तच्या वेळात त्यांना त्याचा सराव करावयास सांगितले गेले. विद्यार्थ्यांना मध्ययुगीन इतिहासाच्या कागदपत्रे आणि शिलालेखांच्या वाचनासाठी आणि सखोल अभ्यासासाठी, तसेच शिवकाळ, पेशवेकाळ याविषयीचे कागदोपत्री पुरावे समजून घेण्यास मोडी लिपीच्या ज्ञानाचा उपयोग झाला. शिवाय तृतीय वर्षाच्या १३ व्या अभ्यासपत्रीकेतील (इतिहासाची क्षेत्रे) आणि ९ व्या अभ्यासपत्रीकेतील(इतिहासलेखनशास्त्र) कागदपत्रे, वस्तुसंग्रहालय इत्यादीच्या आकलनासाठी उपयोग झाला.

उद्दिष्ट पूर्ती- मोडी व ब्राह्मी लिपी अभ्यासामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्थानिक इतिहासाच्या,कागदपत्रे व शिलालेखांच्या अभ्यासामध्ये रुची निर्माण झाली. संशोधक वृत्ती जोपासण्यास मदत झाली. देशातील विविध लिपी व त्यातील साहित्य याबाबत जिज्ञासा निर्माण झाली. मध्ययुगीन इतिहासाच्या साधनांसोबातच प्राचीन भारतीय इतिहासाच्या साधनांविषयीही अभ्यास करण्याची, विशेषतः बौद्ध धर्माच्या तत्वज्ञानाविषयी जाणून घेण्याची जिज्ञासा निर्माण झाली.

इतिहास विभागाचे भित्तीपत्रक ‘भारतीय इतिहासकार व इतिहासलेखन’चे अनावरण
दि.१८.०८.२०१८



इतिहास विभागाचे भित्तीपत्रक ‘प्रसिध्द भारतीय वास्तू व निर्माणकर्ता’चे अनावरण
दि.१७.०९.२०१८



## भित्तीपत्रक प्रकाशन अहवाल

**दि.१८/०८/२०१८**

शनिवार दि. १८/०८/२०१८ रोजी सकाळी १०.३०वाजता महाविद्यालयाच्या इतिहास विभागाच्या भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. बी. ए. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी व माजी विद्यार्थ्यांनी ***'भारतीय इतिहासकार व इतिहासलेखन'*** या विषयावर तयार केलेल्या या भित्तीपत्रकाचे संपादक मंडळावर बी. ए. तृतीय वर्षाच्या चि. सय्यद अकबर, कु. शिंदे अश्विनी, माजी विद्यार्थी चि. जिरगे दत्तात्रय, कु. गुंड रोहिणी, कु. चांदणे सुरेखा, कु. शेख यास्मिन, कु. मगर प्रियंका, या विद्यार्थ्यांनी काम केले.

**प्रा. डॉ. कुलकर्णी जे.आर.** यांच्या हस्ते या भित्तीपत्रकाचे प्रकाशन संपन्न झाले. प्रथम इतिहास विभागातील **प्रा. श्री.कुलकर्णी आर.के.** यांनी या कार्यक्रमाची व भित्तीपत्राकाच्या प्रकाशना मागील भूमिका स्पष्ट केली. त्यानंतर **प्रा.डॉ. कुलकर्णी जे.आर.** यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी विद्यार्थ्यांना शुभेच्छापर मार्गदर्शन करताना त्या म्हणाल्या की, अशा अभ्यासपूर्ण लेखनातूनच इतिहास संशोधनाचे धडे गिरवले जातात. अशा उपक्रमांमधून आपल्या ज्ञानपिपासू व अभ्यासू वृत्तीला दिशा मिळते, त्यामुळे अशा उपक्रमात विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा. नंतर इतिहास विभागातील **प्रा. श्री. कुलकर्णी आर.के यांनी आभारप्रदर्शन केले.**

## भित्तीपत्रक प्रकाशन अहवाल

**दि.१७/०९/२०१८**

सोमवार दि. १७/०९/२०१८ रोजी सकाळी ०८.३०वाजता महाविद्यालयाच्या इतिहास विभागाच्या भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. बी. ए. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी व माजी विद्यार्थ्यांनी *'प्रसिध्द भारतीय वास्तू व निर्माणकर्ता'* या विषयावर तयार केलेल्या या भित्तीपत्रकाच्या संपादक मंडळावर बी. ए. तृतीय वर्षाच्या चि. सय्यद अकबर, कु. शिंदे अश्विनी, माजी विद्यार्थी चि. जिरगे दत्तात्रय, कु. गुंड रोहिणी, कु. चांदणे सुरेखा, कु. शेख यास्मिन, कु. मगर प्रियंका, या विद्यार्थ्यांनी काम केले.

**प्राचर्य डॉ.अनार साळुंके** यांच्या हस्ते या भित्तीपत्रकाचे प्रकाशन संपन्न झाले. प्रथम इतिहास विभागातील **प्रा. श्री.कुलकर्णी जे.आर.** यांनी या कार्यक्रमाची व भित्तीपत्राकाच्या प्रकाशना मागील भूमिका स्पष्ट केली. त्यानंतर **प्राचर्य डॉ.अनार साळुंके** यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी विद्यार्थ्यांना शुभेच्छापर मार्गदर्शन करताना त्या म्हणाल्या की, अशाप्रकारचे अभ्यासपूर्ण लेखन विद्यार्थ्यांकडून सातत्याने व्हावे. अशा उपक्रमांमधून आपल्या ज्ञानपिपासू व अभ्यासू वृत्तीला दिशा मिळते, त्यामुळे अशा उपक्रमात विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा. इतिहास विभागाच्या भित्तीपत्रकाचे एक नाव निश्चित करावे आणि नाविन्यपूर्ण कल्पना त्यामध्ये राबवाव्या, अशी सूचनाही त्यांनी केली. आणि भित्तीपत्रक तयार करण्यासाठी सहभाग घेतलेल्या विद्यार्थी व अध्यापकांचे अभिनंदनही केले. शेवटी इतिहास विभागातील **प्रा. श्री. कुलकर्णी आर.के.** यांनी आभारप्रदर्शन केले.




छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, मुंबई,लामतुरे संग्रहालय, तेर यांच्या सहयोगाने फिरते वस्तुसंग्रहालय आयोजन दि.१५.१२.२०१८

















छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, मुंबईचे प्रतिनिधी

# <u>फिरते वस्तुसंग्रहालय</u>

दि. १५/१२/२०१८

छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, मुंबई व रामलिन्गप्पा लामतुरे वस्तुसंग्रहालय, तेर यांच्या संयुक्त विद्यमाने , सिटी इंडिया आणि पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय यांच्या सहकार्याने १७ ते १९ जानेवारी २०१८ या कालावधीत उस्मानाबाद जिल्हा परिसरात "***<u>फिरते वस्तुसंग्रहालय</u>***" आयोजित करण्यात आले. उस्मानाबाद शहरात मराठी कन्या प्रशाला मैदानात हे बस मधील "***<u>फिरते वस्तुसंग्रहालय</u>***" प्रदर्शित करण्यात आले.  या कार्यक्रमाच्या आयोजनामध्ये व्यंकटेश महाजन महाविद्यालयाच्या इतिहास विभागाने सक्रीय सहभाग नोंदविला .इतिहास विभाग प्रमुख ***प्रा.डॉ. कुलकर्णी जे.आर.*** आणि ***प्रा.श्री. कुलकर्णी आर. के.*** यांनी महाविद्यालायाच्या विद्यार्थ्यांसह या व्यवस्थेत सहभाग घेत शालेय विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयाच्या ***प्राचार्य डॉ. अनार साळुंके*** या कार्यक्रमाच्या उद्घाटन समारोहाच्या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या.

सकाळी १०.०० वाजता संपन्न झालेल्या उद्घाटन सोहळ्याप्रसंगी रामलीन्गाप्पा लामतुरे वस्तुसंग्रहालयाचे  ***श्री. रेवाणप्पा लामतुरे,*** सहाय्यक अभिरक्षक ***श्री अमोल गोटे*** उस्मानाबाद जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी,उस्मानाबादचे शिक्षणाधिकारी श्री. मोकाशी आणि छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, मुंबई येथील कार्यकर्ते व्यासपीठावर उपस्थित होते. सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.०० यावेळेत सर्वांसाठी मोफत व खुले ठेवण्यात आलेल्या या फिरत्या वस्तुसंग्रहालयात भारतीय नाणेपद्धतीचा विकास दाखवणारी साधने, तक्ते, प्रतिकृती इ. गोष्टींचे प्रदर्शन ठेवण्यात आले होते. शहरातील शाळा-महाविद्यालयाचे विद्यार्थी, शिक्षक व इतिहासप्रेमी मंडळींनी या प्रदर्शनाचा लाभ घेतला.




गांधी रिसर्च फौन्डेशन, जळगाव आयोजित गांधी विचार संस्कार परीक्षा-२०१८-१९ आयोजन
दि.१६.१२.२०१८






# गांधी विचार संस्कार परीक्षा

दि. १६/१२/२०१८

उद्देश- राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या विचारांची रुजवणूक नवीन पिढीमध्ये होवून त्यांचे समकालीन उपयोजीत्व त्यांना माहित व्हावे, या उद्देशाने घेतली जाते

पूर्वसुचनेनुसार दि. ११/१२/२०१८ व १६/१२/२०१८ (रविवार) रोजी सकाळी ९.०० ते १०.०० या वेळेत महाविद्यालयाच्या कक्ष क्र.१२,१३ मध्ये गांधी रिसर्च फौंडेशन, जळगाव यांच्या वतीने घेण्यात येणारी **"गांधी विचार संस्कार परीक्षा"**(शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील) आयोजित करण्यात आली. या परीक्षेला व्होकेशनल महाविद्यालयातील २१ विद्यार्थी, तर वरिष्ठ महाविद्यालयातील ४९ विद्यार्थी, असे एकूण ७० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते.

**"गांधी विचार संस्कार परीक्षा"** समन्वयक **प्रा. डॉ. कुलकर्णी जे. आर.** आणि **व्होकेशनल महाविद्यालयाच्या प्रा. आप्पासाहेब माळी** यांचा या परीक्षेच्या आयोजनात प्रमुख सहभाग होता. महात्मा गांधींच्या अथवा त्यांच्या जीवनावरील पुस्तकांवर आधारित ७० गुणांच्या या परीक्षेमध्ये ६० गुण बहुपर्यायी पद्धतीच्या प्रश्नांना, तर १० गुण सविस्तर प्रश्नांना, अशा स्वरुपाची असलेली ही परीक्षा मागील पाच वर्षांपासून महाविद्यालयाच्या इतिहास विभागाच्या वतीने आयोजित केली जाते.





छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, मुंबई,लामतुरे संग्रहालय, तेर यांच्या सहयोगाने आयोजित द्विदिवसीय कार्यशाळेत बोलताना छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, मुंबई येथील श्रीमती कुलकर्णी, जिल्हा सत्र न्यायाधीश श्री जयस्वाल, श्री लामतुरे
दि.१८,१९.१२.२०१८






# वस्तुसंग्रहालय कार्यशाळा

दि. १९/१२/२०१८

छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, मुंबई व रामलिंगप्पा लामतुरे वस्तुसंग्रहालय, तेर यांच्या संयुक्त विद्यमाने , सिटी इंडिया आणि पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय यांच्या सहकार्याने १८ व १९ जानेवारी २०१८ या कालावधीत उस्मानाबाद जिल्ह्यातील रामलिंगप्पा लामतुरे वस्तुसंग्रहालय, तेर येथे शाळा-महाविद्यालयातील शिक्षक, विद्यार्थ्यांसाठी दोन दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. ***"वस्तुसंग्रहालय:अनौपचारिक शिक्षणाचे एक माध्यम"*** या विषयावरील कार्यशाळेत महाविद्यालयाच्या बी ए द्वितीय वर्षाच्या इतिहास विषयाच्या दोन विद्यार्थ्यांनी – ***चि. संतोष दशरथ चव्हाण आणि सौन्दरे शिवराम लिंगाप्पा*** यांनी पूर्णवेळ सहभाग नोंदविला. तर इतिहास विभाग प्रमुख ***प्रा.डॉ. कुलकर्णी जे.आर***. यांनी दि. १९.१२.२०१८ रोजी या कार्यशाळेत सहभाग नोंदविला. या कार्यशाळेत विद्यार्थी अध्यापकांना वस्तूसंग्रहालय, त्याचे प्रकार, रचना, मांडणी, नोंदणी, उपयोग, महत्व आणि छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, मुंबई व त्यांचे अभिनव उपक्रम याविषयी श्रीमती कुलकर्णी व त्यांच्या सहकाऱ्यांनी मार्गदर्शन केले.तर श्री. अमोल गोटे यांनी रामलिंगप्पा लामतुरे वस्तुसंग्रहालय, तेर संदर्भात PPT च्या सहाय्याने माहिती सांगितली. याचवेळी विद्यार्थी-शिक्षकांना पंचमार्क नाणी बनविण्याचे प्रात्यक्षिकही देण्यात आले. सदर कार्यशाळेचा विद्यार्थी-शिक्षकांच्या अध्ययन-अध्यापनात खूप उपयोग होऊ शकतो. शिवाय विद्यार्थ्यांच्या इतिहासातील करियर संबंधीही उपयोग होऊ शकतो.



गांधी रिसर्च फौन्डेशन, जळगाव आयोजित गांधी विचार संस्कार परीक्षेचे पारितोषिक वितरण
(तुळजाभवानी सैनिकी विद्यालय, तुळजापूर येथे) करताना   श्री भुजंग बोबडे व पुरस्कारप्राप्त विद्यार्थी.
दि.१०.०१.२०१९





गांधी विचार संस्कार परीक्षेचे पारितोषिक वितरण कार्यक्रम : उपस्थित मान्यवर





# गांधी विचार संस्कार परीक्षा-पारितोषिक वितरण

**दि. १०/०१/२०१९**

गुरुवार दि. १०/०१/२०१९ रोजी सकाळी १०.०० ते १२.०० यावेळेत गांधी रिसर्च फौंडेशन,जळगाव यांच्या वतीने तुळजाभवानी माध्यमिक व उच्च माध्यमिक सैनिकी विद्यालय, तुळजापूर येथे *गांधी विचार संस्कार* परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण सोहळा आयोजित करण्यात आला. गांधी रिसर्च फौंडेशन,जळगाव येथील गांधी विचार संस्कार परीक्षा विभागाचे *श्री. भुजंग बोबडे, श्री. जोशी,* तुळजाभवानी माध्यमिक व उच्च माध्यमिक सैनिकी विद्यालय, तुळजापूरचे *प्राचार्य श्री. घोडके,* व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालयाच्या इतिहास विभाग प्रमुख व गांधी विचार संस्कार परीक्षा समन्वयक *प्रा. डॉ. कुलकर्णी जयश्री* यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. तसेच *श्री. भुजंग बोबडे व प्राचार्य श्री. घोडके* यांचे मार्गदर्शनही उपस्थितांना लाभले.

व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय व व्होकेशनल महाविद्यालय, उस्मानाबादच्या विद्यार्थ्यांनाही यावेळी पुरस्कार प्रदान करण्यात आले. जिल्हा पातळीवरील हे पुरस्कार पुढीलप्रमाणे होत-

१) *सय्यद अकबर चांदपाशा – बी ए तृतीय वर्ष - सुवर्ण पदक*
२) *प्रजापती ज्योती जगदीश – १२ वी A & A – रजत पदक*
३) *कुंभार रजनी सुर्यकांत - बी.ए. द्वितीय वर्ष –कास्य पदक*

# गांधी विचार संस्कार परीक्षा-पारितोषिकप्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार


**दि. ११/०१/२०१९**

गुरुवार दि. १०/०१/२०१९ रोजी सकाळी १०.०० ते १२.०० यावेळेत गांधी रिसर्च फौंडेशन,जळगाव यांच्या वतीने तुळजाभवानी माध्यमिक व उच्च माध्यमिक सैनिकी विद्यालय, तुळजापूर येथे ***गांधी विचार संस्कार*** परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. यामध्ये व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय व व्होकेशनल महाविद्यालय, उस्मानाबादच्या पुरस्कारप्राप्त विद्यार्थ्यांचा ***सय्यद अकबर चांदपाशा – बी ए तृतीय वर्ष - सुवर्ण पदक , प्रजापती ज्योती जगदीश – १२ वी A & A – रजत पदक, कुंभार रजनी सुर्यकांत - बी.ए. द्वितीय वर्ष –कास्य पदक*** यांचा दि. ११/०१/२०१९, शुक्रवार रोजी दुपारी १२.५० वाजता महाविद्यालयाच्या ***प्राचार्य डॉ. अनार साळुंके*** यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाच्या इतिहास विभाग प्रमुख व गांधी विचार संस्कार परीक्षा समन्वयक व ***प्रा. डॉ. कुलकर्णी जयश्री,*** व्होकेशनल महाविद्यालयाचे परीक्षा समन्वयक प्रा.माळी आप्पासाहेब , महाविद्यालाचे विद्यार्थी व कर्मचारी हे उपस्थित होते.

या सत्कार समारंभामुळे यशवंत विद्यार्थ्यांना विविध स्पर्धांमध्ये सहभागी होऊन यशस्वी वाटचाल करण्यासाठी प्रोत्साहन मिळाले.



इतिहास विभागाचे भित्तीपत्रक 'महाराष्ट्रातील स्त्री समाजसुधारक'चे अनावरण करताना रोटरी क्लब अध्यक्ष श्री पवार, प्राचार्य डॉ. ए आर साळुंके. दि.२२.०१.२०१९



# भित्तीपत्रक प्रकाशन अहवाल

दि.२२/०१/२०१९

मंगळवार दि. २२/०१/२०१९ सकाळी ११.३० वाजता महाविद्यालयाच्या इतिहास विभागाच्या भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. बी. ए. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी *'महाराष्ट्रातील स्त्री समाजसुधारक'* या विषयावर तयार केलेल्या या भित्तीपत्रकाचे संपादक मंडळावर बी. ए. द्वितीय वर्षाच्या चि. चव्हाण संतोष, सौन्दरे अभिजित या विद्यार्थ्यांनी काम केले. तर इतिहास विभाग प्रमुख प्रा.डॉ. कुलकर्णी जयश्री आणि सहकारी प्रा. श्री. कुलकर्णी रवींद्र यांनी त्यांना मार्गदर्शन केले.

*मा. प्राचार्य डॉ. अनार साळुंके, रोटरी अध्यक्ष श्री. पवार* यांच्या हस्ते या भित्तीपत्रकाचे प्रकाशन संपन्न झाले. प्रथम इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. कुलकर्णी जे. आर. यांनी या कार्यक्रमाची व भित्तीपत्राकाच्या प्रकाशना मागील भूमिका स्पष्ट केली. त्यानंतर मा. प्राचार्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी विद्यार्थ्यांना शुभेच्छापर मार्गदर्शन करताना मा.प्राचार्य म्हणाल्या की, अशा भित्तीपत्रक निर्मितीतून विद्यार्थ्यांमध्ये वाचन वृत्ती व ज्ञानपिपासा निर्माण होते. तसेच अभिव्यक्ती कौशल्य विकसित होते. अशा उपक्रमांमधून आपल्या संशोधन व अभ्यास वृत्तीला दिशा मिळते, त्याचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा. मा. प्राचार्यांच्या मार्गदर्शना नंतर इतिहास विभागातील प्रा. श्री. कुलकर्णी आर.के. यांनी आभारप्रदर्शन केले.




बुर्ला महिला महाविद्यालय,सोलापूर येथे आयोजित राज्यस्तरीय विद्यार्थी इतिहास परिषदेमध्ये सत्राध्यक्ष पदी प्रा. कुलकर्णी जयश्री, तर शोधनिबंध सादर करताना विद्यार्थी सय्यद अकबर(बी ए तृतीय वर्ष) दि.२६.०२.२०१९








बुर्ला महिला महाविद्यालय,सोलापूर येथे आयोजित राज्यस्तरीय विद्यार्थी इतिहास परिषदेमध्ये उत्कृष्ट शोधनिबंध सादरीकरणाचे पुरस्कार स्वीकारताना विद्यार्थी सय्यद अकबर व पालक इस्माईल शेख

दि.२६.०२.२०१९





# विद्यार्थी इतिहास परिषद- पुरस्कार प्राप्ती

दि.२६/०२/२०१९

मंगळवार दि. २६/०२/२०१९ सकाळी १०.३० ते सायंकाळी ६.०० यावेळेत बुर्ला महिला महाविद्यालय, सोलापूर येथे आयोजित १६व्या राज्यस्तरीय विद्यार्थी इतिहास परिषदेत महाविद्यालयाच्या इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. कुलकर्णी जे. आर. यांनी मध्ययुगीन इतिहास विभागाचे सत्राध्यक्ष म्हणून पद भूषविले. तसेच 'मध्ययुगीन भारतीय इतिहासलेखन' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शनही केले.

या परिषदेत महाविद्यालयाच्या दोन विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून यश संपादन केले. *बी ए तृतीय वर्षाचा विद्यार्थी सय्यद अकबर चांदपाशा* याने मध्ययुगीन इतिहासाच्या सत्रात *"परंडा तालुक्यातील निवडक धार्मिक स्थळे"* या विषयावर शोधनिबंध सादर करून *द्वितीय क्रमांक* पटकावला. तर *बी ए द्वितीय वर्षाच्या कु. शेख आलिशा इस्माईल* हिने प्राचीन इतिहास सत्रामध्ये *"उस्मानाबादची पुरातन जैन लेणी : चिकित्सात्मक अभ्यास"* या विषयावर शोधनिबंध सादर करून *तृतीय क्रमांक* मिळविला. या इतिहास परिषदेच्या समारोप सत्रात प्रसिध्द इतिहास संशोधक व प्राध्यापक श्री एम.एम. मस्के, श्री गरड यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

दि. २७.०२.२०१९ रोजी सकाळी १०.३० वाजता महाविद्यालयाच्या संचालक श्रीमती रेखाताई महाजन आणि प्राचार्य डॉ. अनार साळुंके यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.




नळदुर्ग किल्ल्याच्या प्रवेशद्वारासमोर सहलीतील सहभागी विद्यार्थी-अध्यापक - नळदुर्ग सहल दि.०२.०३.१९









नळदुर्ग किल्ल्यावरील वास्तू-

# किल्ले नळदुर्ग आणि परिसर : शैक्षणिक सहल

**दि.०२/०3/२०१९**

शनिवार दि. ०२/०3/२०१९ रोजी सकाळी ९.३० ते सायंकाळी ६.३० यावेळेत महाविद्यालयाच्या इतिहास विभागाच्या वतीने इतिहासाच्या विद्यार्थ्यांसाठी उस्मानाबाद जिल्ह्यातील प्रसिध्द ऐतिहासिक स्थळ किल्ले नळदुर्ग आणि परिसर येथे आयोजित करण्यात आली. या सहलीमध्ये कला शाखेतील इतिहास अभ्यास व पर्यटनाची आवड असणारे ११ मुले व १३ मुली असे एकूण २४ विद्यार्थी, तसेच 3 प्राध्यापक सहभागी झाले. .

सकाळी ९.३० वाजता महाविद्यालयातून निघून ११.०० वाजता नळदुर्ग येथे पोहोचल्यावर सर्वप्रथम नळदुर्गचा अभूतपूर्व किल्ला, त्याची रचना व त्यातील वैविध्यपूर्ण वास्तूंचे अभ्यासपूर्ण अवलोकन विद्यार्थ्यांनी केले. इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. कुलकर्णी जे. आर. यांनी विद्यार्थ्यांना किल्ल्याचा पूर्वेतिहास व आजपर्यंतच्या घडामोडी सविस्तर सांगितल्या.या किल्ल्याचे बांधकाम प्राचीन राजा नळ आणि राणी दमयंती यांच्या काळात सुरु झाल्याची आख्यायिका आहे. ऐतिहासिक पुराव्यानुसार कल्याणीच्या चालूक्यांकडून बहामनी, नंतर बहामन शाहीच्या आदिलशाही व नंतर मुघलांकडे असे हस्तांतर होऊन हा किल्ला शेवटी भारतीय स्वातंत्र्यापर्यंत हैद्राबादच्या निजामाकडे होता.

१२५ एकरात पसरलेल्या नळदुर्ग किल्ल्याची रचना नळाच्या आकाराची आहे. हा किल्ला महाराष्ट्रातील सर्वात मोठा भुईकोट किल्ला असून त्याला 3 किलोमीटर लांबीची तटबंदी,११४ बुरुज आणि बाहेरून संरक्षक खंदक आहे. किल्ल्याजवळून वाहणाऱ्या बोरी नदीवर धरण बांधून दुसऱ्या इब्राहीम आदिलशहाने किल्ल्यात पाण्याची सोय केलेली आहे. याच जलप्रवाहावर त्याने अद्भुत असा पाणीमहाल बांधलेला असून त्याला असलेल्या दोन सांडव्यांना राजा-राणी अथवा नर-मादी सांडवा असे म्हणतात. याव्यतिरिक्त लक्ष्मी मंदिर, गणेश मंदिर, जमा मशीद, अंबरखाना, रंगमहाल, हमामखाना, हत्ती तलाव, हत्ती दरवाजा, रणमंडळ, मुन्सीफ कोर्ट या व अशा अनेक वैशिष्ट्यपूर्ण वास्तू, तसेच अनेक लहान-मोठ्या तोफा किल्ल्यात आहेत. हल्ली किल्ल्याचे सुशोभीकरण, स्वच्छता करून पर्यटकांसाठी नौकानयन, घोडेस्वारी, बाग-बगीचे, कारंजे, इलेक्ट्रिक बग्गी, खानपानाची सुविधा केलेली आहे.

किल्ल्याजवळच एक धबधबा आहे. तसेच रामकुंड नावाचे पवित्र कुंड आहे. पावसाळयात येथील दृश्य पाहण्यास पर्यटकांची गर्दी होते.या सर्व ठिकाणांना भेटी देऊन संध्याकाळी ५.०० वाजता नळदुर्ग येथून निघून सर्वजण सायंकाळी ६.३० वाजता महाविद्यालयात परतले. अशात-हेने ही अभ्यास सहल संपन्न झाली. विद्यार्थ्यांना इतिहास अभ्यासाचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला.